संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

उपलब्ध सुविधा

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४६ वा ● ● शनिवार दि. १२ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# नवाब मलिकांना जामीन मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रसचे नेते, माजी मंत्री, आमदार नवाब मलिक यांना अखेर दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने प्रकृतीच्या कारणास्तव नवाब मलिक यांना जामीन मंजूर केला आहे. दोन महिन्यांसाठी हा जामीन असणार आहे.

नवाब मलिक यांच्या वैद्यकीय कारणासाठी उच्च न्यायालयात जामिनासाठी याचिका दाखल केली होती. पण, १३ जुलैला उच्च न्यायालयाने मलिक यांचा जामिन अर्ज फेटाळला होता. त्यामुळे मलिकांना धक्का बसला होता. त्यामुळे नवाब मलिकांना आणखी किती दिवस तुरुंगात काढावे



नवाब मलिक

लागणार? अशा चर्चा रंगल्या होत्या. पण, अखेर मलिकांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अंडरवर्ल्डशी असलेलं कथित प्रकरण आणि मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात २३ फेब्रवारी २०२२ रोजी अटक करण्यात आली होती. पण, किडनी संबंधित असलेल्या दुर्धर आजाराशी मलिक यांना ग्रासलं होतं. दरम्यान, मलिक किडनी आजाराशी ग्रासलेलं असून, त्यांना जामीन देण्याची मागणी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी केली. यावर ईडीकडून महाधिवक्ता तुषार मेहता यांनीही विरोध दर्शवला नाही.

# आम. पडळकर यांची शिवाजी विद्यापीठ सिनेटवर नियुक्ती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** भाजपचे विधानपरिषद आमदार गोपीचंद पडळकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर नियुक्ती झाली आहे. या निवडीचे पत्र विधानमंडळ सचिवालयाच्या अव्वर सचिव पुष्प दळवी यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहे. गोपीचंद पडळकर हे विधान परिषद सदस्य



आम. गोपीचंद पडळकर

आहेत. विद्यापीठाच्या सिनेटवर विधान परिषदेतून एका लोकप्रतिनिधीची निवड केली जाते. विधान परिषद उपसभापती यांनी गोपीचंद पडळकर यांची नेमणूक केली आहे. ३ ऑगस्ट २०२३ पासून १३ मे २०२३ पर्यंत पडळकर सिनेट सदस्य म्हणून कायम राहतील. असे आदेशात नमूद केले आहे.

# रोहयो अंतर्गत १ कोटी ८५ लाखांचा निधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तसेच खानापूर तालुक्यातील विविध विकास कामासाठी रोजगार हमी योजने मधून १ कोटी ८५ लाखांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आम. गोपीचंद पडळकर यांनी दिली.

आटपाडी तालुक्यातील ३१ गावातील पेव्हिंग ब्लॉक कामाकरिता हा निधी देण्यात आला आहे. तर खानापूर तालुक्यातील ५ गावातील कामांना ही निधी देण्यात आला असून यामध्ये सांगोला तालुक्यातील कटफळ येथील महादेव मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविण्यासाठी



मंत्री संदीपन भुमरे



आम. गोपीचंद पडळकर

निधी देण्यात आला आहे. सदरचा निधी हा रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार हमी मंत्री संदिपान भुमरे यांनी मंजूर केला असून याबाबत मंत्री संदीपन भुमरे यांचे अभिनंदन केले आहे.

# करगणीतील संभाजी भिडे यांच्या व्याख्यानास परवानगी दिल्यास सभा उधळणार

## वंचितचे साहेबराव चंदनशिवे यांचे पोलीस प्रशासनास निवेदन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** करगणी ता. आटपाडी येथील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान शाखा करगणी यांच्यावतीने १३ ऑगस्ट रोजी संभाजी भिडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास परवानगी देऊ नये, अन्यथा संभाजी भिडे यांची सभा सभा उधळणार लावू असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष साहेबराव चंदनशिवे यांनी पोलीस प्रशासनास दिला असून याप्रकरणी निवेदन देण्यात आले आहे.

आपल्या व्याख्यानातून तरुणांना खोटा इतिहास सांगून तरुणांची माथी भडकविण्याचे काम संभाजी भिडे करीत आहेत. अशाच प्रकारची गरळ ओकण्याची व शांतताप्रिय समाजात ठिणग्या पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या करगणी येथील व संपूर्ण तालुक्यात कुठेही व्याख्यानास परवानगी देण्यात येऊ नये असे वंचित बहुजन आघाडीने निवेदनात म्हटले आहे.





**आटपाडी : करगणी येथे होणाऱ्या संभाजी भिडे यांच्या सभेला परवानगी देवू नये बाबतचे निवेदन प्रशासनास देताना वंचितचे पदाधिकारी**

या निवेदनावर आबासो काटे, संतोष वाघमारे, रविकांत सोहनी, साहेबराव वाघमारे, जगन्नाथ सावंत, दशरथ सोहनी, नंदकुमार पवार, संजय हेगडे, यशवंत ऐवळे, शुभम सागर, गोविंद हेगडे, राहुल साबळे, नानासो गवंड, रघुनाथ चव्हाण, मनोहर जावीर यांच्या सह्या आहेत.

श्री. शिवछत्रपतींचे हिंदवी स्वराज आणि बत्तीस मण सिंहासन या विषयावरती त्यांचे करगणी येथे १३ ऑगस्ट रोजी व्याख्यानाचे आयोजन केले आहे. अमरावती जिल्ह्यात महात्मा गांधी यांच्याविषयी व त्यांच्या वडीलाविषयी गैरसमज, अपमानास्पद करणारी माहिती दिल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला आहे. त्यातच करगणी येथेही असेच होण्याची शक्यता असलेने त्याच्या भाषणावरती बंदी घालनेची गरज आहे.

'कुंकू लावून ये, मग तुझ्याशी बोलीन' असे महिला पत्रकाराविषयी गैरवर्तन, आंबा खाल्ल्याने मुले होतात, भीमा कोरेगाव प्रकरणातील संशयित संभाजी भिडे ही मनुवादी विचारसरणी जोपासणारी महाराष्ट्राला लागलेली कीड आहे. भिडेंच्या वक्तव्याप्रकरणी नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनातही गदारोळ झालेला आहे. आजपर्यंत भिडेंना अटक झाली नाही म्हणजे भिडे हे महात्मा गांधीपेक्षा श्रेष्ठ आहेत की काय ? असा सवाल ही वंचित बहुजन आघाडीने व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यांच्या व्याख्यानास बंदी घालावी अशी मागणी होत आहे.

**संभाजी भिडे वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा**

अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रपिता महात्मा गांधी विषयी बेताल वक्तव्याप्रकरनी त्यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल व्हावा अशा मागणीचे दुसरे निवेदन वंचित बहुजन आघाडीने दिले आहे. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनीही याप्रकरणी गुन्हा दाखल व्हावा याकरिता नुकतेच निवेदन दिले आहे.

# विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्रामध्ये संशोधन करावे : प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधन वृत्ती जोपासून खगोलशास्त्रामध्ये संशोधन करावे असे उद्गार प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे आंतरराष्ट्रीय चंद्र दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले आपल्या भारत देशाने चांद्रयान-३ मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करीत अखंड विश्वाचे लक्षवेधून घेतले आहे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर असणारे विविध घटक , पाणी , वातावरण इ.चा अभ्यास या मोहीमेतून समोर येणार आहे.

यावेळी खगोलशास्त्राचे अभ्यासक प्रा.रोहित लोंढे यांचे व्याख्यान आयोजिले होते. भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी चांद्रयान मोहिमेसंदर्भातील भित्तिपत्रिकांचे प्रदर्शन भरविले होते. विद्यार्थ्यांनी चांद्रमोहिमेवर चर्चासत्राचे



**तासगाव : येथे आंतरराष्ट्रीय चंद्र दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे**

आयोजन केले होते, यामध्ये कु.निकिता पाटील, कु.साक्षी माने, कु. अरसिया पिंजारी, कु.अंजु पाटील,अभय हजारे यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जीवन घोडके यांनी केले तर प्रा. सुशांत कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकिता यादव यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.बी.ए.हराळे, प्रा.मेघा पवार, यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** ऑनलाईन ट्रेडिंगनंतर फायद्याचे आमिष दाखवून बनावट बँक खात्याच्या माध्यमातून फसविण्याचा प्रकार सांगली पोलीसांनी उघडकीस आणला आहे. या माध्यमातून गंडा घालण्यासाठी बनावट खात्यावर जमा झालेली ७ कोटी ८१ लाखाची रक्कम गोठवण्यात आली असून फसवणूक झालेल्यांनी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधिक्षक बसवराज तेली यांनी शुक्रवारी पत्रकार बैठकीत केले.

हर्षवर्धन पाटील (रा. इस्लामपूर) यांनी २१ लाख १० हजाराची फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. संशयितांनी कॅपिटलिक्स ऑनलाईन टेलीग्राम ग्रुपवरुन संवाद साधून अधिक फायद्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास सांगितले. यासाठी बँक खाते नंबर देण्यात आला. परताव्यासाठी करापोटी आणखी पैसे जमा करण्यासाठी वेगवेगळे खाते नंबर चॅटिंगद्वारे देण्यात आले.

या प्रकरणी तक्रार दाखल होताच उप विभागीय पोलीस अधिकारी मंगेश चव्हाण, इस्लामपूर व सायबर पोलीस यांनी संयुक्त तपास केला. यावेळी धक्कादायक माहिती समोर आली. विविध बँकेत २७ बनावट खाती काढून फसवणुकीचा फंडा वापरण्यात येत असल्याचे समोर आले. खाती ज्यांच्या नावे आहेत ते सामान्य लोक असून त्यांनाही या व्यवहाराची माहिती नाही. यामधील मुख्य टोळी अद्याप उघडकीस आलेली नसली तरी संशयास्पद २७ खात्यावर जमा असलेली ७ कोटी ८१ लाखाची रक्कम गोठवण्यात आली आहे.

भाऊ कन्स्ट्रक्शन

बिल्डर्स & डेव्हलपर्स

9004792356

- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# प्रेयसीबरोबर हॉटेलात आलेल्या तरूणावर जमावाकडून हल्ला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** समाज माध्यमावर आक्षेपार्ह स्टेटस ठेवणे, कथित लव्ह जिहादच्या नावाखाली किंवा गोहत्येच्या संशयावरून झुंडीने हल्ले करणे, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मारहाण करणे यासारखे प्रकार सोलापुरात वाढले असताना त्यात आणखी एका घटनेची भर पडली आहे. दोघेही विवाहीत असलेल्या आणि एका हॉटेलात जेवण करण्यासाठी एकत्र आलेल्या भिन्नधर्मांच्या प्रेमीयुगुलाला तरूणांच्या जमावाने पकडले.

यात तरूणाला बेदम मारहाण करून दुसरीकडे पळवून नेत पुन्हा मारहाण करण्याचा प्रकार उजेडात आला आहे. झुंडीच्या हल्ल्यातून तरूणाला वाचविणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी ही बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून दिली असता पोलिसांनी दाद न देता उलट त्या कार्यकर्त्यांनाच उद्देशून जातीवाचक भाषा केल्याची तक्रार संबंधित कार्यकर्त्यांच्या संघटनेने पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्याकडे केली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यात एकाच गावात राहणारे आणि विवाहीत असलेले भिन्नधर्मीय प्रेमीयुगुल सोलापुरात छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील एका हॉटेलात वण करण्यासाठी आले होते. तेव्हा अचानकपणे धुडघूस घालत तरूणांची झुंड तेथे आली आणि ,उन्मादाच्या घोषणा देत, संबंधित प्रियकर तरूणाला बेदम मारहाण करायला सुरूवात केली. नंतर त्या तरूणाला हॉटेलातून बाहेर काढत पुणे रस्त्यावर बाळेनजीक पुलाखाली पळवून नेऊन पुन्हा बेदम मारहाण केली गेली. सुदैवाने तेथून जाणाऱ्या मातंग समाजाच्या काही समंजस कार्यकर्त्यांनी त्या तरूणाची हल्ल्यातून कशीबशी सुटका केली. त्यास फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आणले असता तेथील पोलिसांनी चौकशीत जखमी तरूणाची दखल घेतली तर नाहीच, उलट त्याला वाचविणाऱ्या कार्यकर्त्यांनाच अवमानकारक, जातीवाचक भाषा वापरून हाकलून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी जखमी तरूणाला त्याच्या गावी परत पाठविल्यानंतर इकडे या प्रकरणाला दुसरेच वळण लागल्याचे दिसून आले. जातिवाचक भाषा वापरून पोलिसांनी हीन वागणूक दिल्याची तक्रार संबंधित कार्यकर्त्यांनी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद यांनीसं बंधित जखमी तरूणाने फिर्याद देण्यास नकार दिल्यामुळे त्यास परत पाठविण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

तथापि, या प्रकरणात उध्दव ठाकरे शिवसेनेचे नेते, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे यांनी, पोलिसांवर बेजबाबदार आणि अन्यायी वर्तनाचा आरोप केला आहे. झुंडीने ज्या तरूणाला कथित लव्ह जिहादच्या नावाखाली बेदम मारहाण केली, त्याची गंभीर दखल घेऊन हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करायला हवे होते. परंतु जखमी तरूणाला फिर्याद देण्यास बाध्य करून परत पाठवून उलट त्यास झुंडीच्या हल्ल्यापासून वाचविणा-या मातंग समाजाच्या कार्यकर्त्याला पोलिसांनी जातीवाचक भाषा वापरून मारहाण केली. यात फिर्याद नोंदवून न घेता तक्रार द्या, चौकशी करून कारवाई करू, असे पोलीस सांगतात. म्हणजे मूळ जखमी तरूणावरील हल्ल्याचा गुन्हा पोलिसांनी दडपताना, जखमी तरूणाला वाचविणा-या कार्यकर्त्याला मारहाण केली, हा प्रकार संतापजनक आहे. संबंधित दोषी पोलिसांवर तातडीने गुन्हा दाखल न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा खंदारे यांनी दिला आहे.

# संपादकिय

## मणिपूरसाठी फक्त दोन मिनिटे?

मणिपूरच्या मुद्यावरून संसदेमध्ये मोठ्या गदारोळ झाला. विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव आणला होता. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उत्तर दिलं. आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसने पक्ष नाव, चिन्ह सगळं कसं चोरलं ते सांगितलं. तसंच मणिपूरच्या मुद्द्यावरही भाष्य केलं. आता या सगळ्यावर राहुल गांधींची प्रतिक्रिया आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १३३ मिनिटांच्या भाषणात फक्त दोन मिनिटं मणिपूरचा उल्लेख केला असं आता राहुल गांधींनी म्हटलं आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मणिपूर प्रकरणावरून नरेंद्र मोदी यांच्यावर टीका होत आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. जर मोदींनी ठरवलं तर भारताचं लष्कर अवघ्या दोन दिवसांमध्ये मणिपूरमधली परिस्थिती नियंत्रणात आणू शकतं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी ही आग विझवू इच्छित नाहीत. त्यांना हा भडका वाढवायचा आहे असा आरोप राहुल गांधींनी केला. तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात फक्त दोन मिनिटं मणिपूरचा उल्लेख केला असंही राहुल गांधींनी म्हटलं आहे.

मणिपूरच्या कुकी क्षेत्रात जेव्हा मी गेलो तेव्हा मला हे सांगितलं गेलं की तुमच्या सुरक्षेत कुणीही मेईतेई माणूस नको, त्याला ठार केलं जाईल. तसेच जेव्हा मी मेईतेई असलेल्या भागांमध्ये गेलो तेव्हा सांगण्यात आलं की कुकी माणूस नको त्याला ठार केलं जाईल. मी १९ वर्षांपासून राजकारणात आहे. मात्र कुठल्याही राज्यात अशी परिस्थिती पाहिलेली नाही. मणिपूर दोन भागांमध्ये वाटलं जातं आहे.

यावेळी राहुल गांधी असंही म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जेव्हा बोलत होते तेव्हा ते खिल्ली उडवण्याच्या मनस्थितीत होते. संसदेत ज्या गोष्टी बोलायला नको त्या बोलल्या गेल्या. राहुल गांधी असंही म्हणाले की मणिपूरमध्ये भारतमातेची हत्या झाली हे बोललो त्याचं कारणही तेच होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरप्रश्नी गंभीर दिसले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींना माझा चेहरा टीव्हीवर पाहण्यास आवडत नाही असंही मला कधी कधी वाटतं असंही राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी केलेल्या या टीकेला भारतीय जनता पक्षाकडून मूळ मुद्दा सोडून भलतीच टीका केली जात आहे. त्यामुळे मणिपूरच्या प्रश्नाबाबत संसदेत मोदी फक्त दोन मिनिट बोलले हे सध्या तरी पटण्यासारखे आहे हे मात्र नक्की.

# रास्त भाव दुकानासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुरवठा शाखा कार्यालयाकडून ३९ गावातील ४६ नवीन रास्त भाव दुकानाकरिता जाहीरनामा काढण्यात आला असून जाहीरनाम्याच्या अनुषंगाने रास्त भाव दुकान परवाना मंजूर करून देण्यासाठी इच्छुक व पात्र संस्था, बचत गट यांनी विहीत मुदतीत तहसिलस्तरावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले आहे.



जिल्ह्यातील मिरज, जत, तासगाव, खानापूर-विटा, कवठेमहांकाळ, वाळवा, शिराळा, कडेगाव, आटपाडी, मिरज तालुक्यातील अन्न धान्य वितरण अधिकारी श्रेणी-२ सांगली या तालुक्यामधील ३९ गावातील ४६ नवीन रास्त भाव दुकानांचे जाहीरनामे काढण्यात आले आहेत. शासन परिपत्रकानुसार रद्द असलेली, राजीनामा दिलेली, लोकसंख्या वाढ व नवीन महसूल गाव निर्मितीमुळे तसेच विविध कारणामुळे भविष्यात द्यावयाची रास्त भाव दुकाने व किरकोळ दुकाने, पंचायत (ग्रामपंचायत), स्वयंसहायता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था अधिनियम कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, महिला स्वयंसहायता बचतगट व महिलांच्या सहकारी संस्था यांना प्राधान्यक्रमानुसार देण्याच्या आहेत. गटाची निवड करताना ज्येष्ठ, वर्धनक्षम व नियमित कार्यरत असलेल्या, अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमित असलेल्या व प्रतिवर्षी लेखापरीक्षण केलेल्या गटास प्राधान्य देण्यात यावेत. तसेच प्राधान्यक्रमानुसार रास्त भाव दुकान परवाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाव्दारे करणे आवश्यक राहील असे शासनाचे निर्देश आहेत. संबंधित तालुक्यांनी याचा लाभ घ्यावा.

तालुका व गावनिहाय काढण्यात आलेले रास्त भाव दुकानांचे जाहीरनामे पुढीलप्रमाणे. वाळवा - खरातवाडी, येलूर, महादेववाडी, फार्णेवाडी, इस्लामपूर (दुकान संख्या-२), देवर्डे, बिचूद. जत - साळमाळगेवाडी, निगडी खुर्द, मायथळ, सालेकेरी, पाच्छापूर, पारधीवस्ती-पांडोझरी, सोनलगी, आबाचीवाडी-कुनिकोणूर, लमाणतांडा-उटगी, मोटेवाडी-कोंतेबोबलाद. कवठेमहांकाळ - नागज (दुकान संख्या-२), कुंडलापूर, दुधेभावी. मिरज - मानमोडी, कळंबी, मल्लेवाडी, पाटगाव, मिरज (दुकान संख्या-३). कडेगाव - कोतीज, वांगरेठरे. खानापूर-विटा - कुसबावडे, देवनगर. तासगाव - नागेवाडी, मणेराजुरी. शिराळा - फकिरवाडी, खुंदलापूर. आटपाडी - गुळेवाडी, माळेवाडी. अन्न धान्य वितरण अधिकारी श्रेणी-२ सांगली - सांगली (दुकान संख्या-३), कवठेपिरान (दुकान संख्या-२), दुधगाव, नावरसवाडी.

रास्त भाव दुकान मंजूर करताना विचारात घेण्यात येणारे निकष व अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रती जोडण्याबाबतची माहिती व अर्जाचा नमुना ु.रिपसश्रळ.पळल.ळप या वेबसाईटवरती दिलेला आहे. तसेच जाहीरनामा तहसिलदार कार्यालय यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेला आहे.

# सदाशिवनगर येथे कृषी सल्ला केंद्राचे उदघाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/विष्णू भोंगळे :** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज, संचलित रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलुज महत्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी संलग्नित ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम २०२३ - २४ कृषी सल्ला केंद्राचे उदघाटन सदाशिवनगर ग्रामपंचायतीचे सरपंच विरकुमार दोशी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच उदय धाईजे, आरपीआयचे जिल्हाअध्यक्ष सोमनाथ भोसले, ग्रामसेवक प्रशांत रुपनवर, विष्णु भोंगळे, पोलिस पाटील, अपर्णा लोंढे, विलास फडतरे, मल्हारी भुजबल, लालखान पठाण, बबन भुजबल, मदन सुळे, प्रदीप पालवे उपस्थित होते.



**सदाशिवनगर येथे कृषी सल्ला केंद्राचे उदघाटन प्रसंगी उपस्थित, सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच उदय धाईजे यांच्यासह मान्यवर**

यावेळी कृषीदुत यांनी शेतकऱ्यांना माती परिक्षणाचे मुल्य, पिकांवरील रोगाची घ्यावयाची काळजी व उपाय, भरघोस उत्पन्न होण्यासाठी मार्गदर्शन, शेतमाल निर्यात व साठवणुक यांचे फायदे व तोटे याविषयी मार्गदर्शन केले.

अकलुज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शना खाली रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जी. नलवडे, समन्वयक प्रा.एस.एम. एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एम.चंदनकर, प्राध्यापिका एच.व्ही. कल्याणी यांचे मार्गदर्शना नुसार कृषीदुत तेजस काटे, अशितोष गायकवाड, प्रताप कटके, तुषार चव्हाण, अभिषेक शिरसट, महेश शेटे, मकसुद पठाण, रोहण खंदारे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला शेतकरी व ग्रामस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या तरुणास अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने लॉजवर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी इचलकरंजी येथे शुक्रवारी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विनायक निवास चव्हाण (रा. कोरोची) असे संशयिताचे नांव असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या प्रकरणी पिडीत मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, संशयित विनायक चव्हाण याने पिडीत मुलीला कॉलेजला सोडण्यासाठी म्हणून मोटरसायकलवर घेतले. परंतु तिला कॉलेजला न सोडता तिला कोल्हापूर रोडवरील नंदनवन या लॉजवर नेले. त्याठिकाणी तिच्याशी लगट करत जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुझे काही खरे नाही, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# प्रसिद्ध अभिनेत्री व माजी खासदार जया प्रदा यांना शिक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चेन्नई :** चेन्नई न्यायलयाने प्रसिद्ध अभिनेत्री आणि माजी खासदार जया प्रदा यांना ६ महीने तुरुंगवासाची शिक्षा सुनावल्याचं वृत्त नुकतंच समोर आलं आहे. चेन्नईच्या रायपेटा विभागातील जया प्रदा यांच्या मालिकेच्या चित्रपटगृहातील कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने हा निकाल दिला आहे. याबरोबरच त्यांना ५००० रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

या चित्रपटगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना इएसआयचे पैसे दिले नसल्याने त्यांनी चित्रपटगृहाच्या मॅनेजमेंटविरोधात न्यायलयात धाव घेतली आहे. कोर्टात प्रकरण गेल्यावर थकलेली रक्कम परत देण्याचे आश्वासनही अभिनेत्री जया प्रदा यांनी दिले. इतकंच नव्हे तर हा खटला रद्द करण्याची विनंतीसुद्धा जया प्रदा यांनी केली.

कामगार सरकारी विमा मंडळाने नेमलेल्या वकिलांनी मात्र यावर आक्षेप घेतला. त्यानंतर या प्रकरणात आता जया प्रदा यांच्यासह आणखी तीन लोकांनाही सहा महिन्यांची शिक्षा आणि ५००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पोलिस या प्रकरणाची आणखी कसून चौकशी करत आहेत.










दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्याहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनाचा ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ मंगळवार, १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात कामगार मंत्री आणि सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्याहस्ते संपन्न होणार आहे.
मुख्य शासकीय समारंभात निमंत्रित मान्यवरांना सहभागी होता यावे यासाठी दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ८.३५ ते ९.३५ या वेळेत ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३५ च्या पूर्वी किंवा ९.३५ वाजल्यानंतर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे होणाऱ्या ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नी व आईवडील व मान्यवर नागरिकांनी उपस्थित रहावे. ध्वजारोहणाचा समारंभ सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे आसनस्थ व्हावे व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही बॅग सोबत आणू नये. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा यासाठी नागरिकांनी बेवसाईटव्दारे होणारे थेट प्रक्षेपण पहावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** राष्ट्रध्वजाचा मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा तसेच त्याचा अवमान होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करू नये, असे आवाहन केले आहे.
दरवर्षी प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व महत्त्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्या वेळी विद्यार्थी व नागरिकांकडून कागदाच्या व प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर फाटलेले कागदी तसेच प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात. असे राष्ट्रध्वज पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वजसंहितेच्या कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत तरतूद केलेली आहे.
केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. कार्यक्रमानंतर असे कागदी व प्लॅस्टीकचे राष्ट्रध्वज संबंधिताकडून इतस्तत: टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. या अनुषंगाने सर्व आस्थापनांना आवश्यक त्या उपाययोजना करून दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही यासाठी जनतेने देखील आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.
राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा. जाणीवपूर्वक राष्ट्रध्वजाचा अवमान करण्याचा प्रयत्न केल्यास राष्ट्रीय अवमान प्रतिबंध कायदा १९७१ अन्वये कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिला आहे.

# केनियाला भारताकडून स्वस्त दरात बाष्पकांचा पुरवठा शक्य

## कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे : नैरोबी येथे बॉयलर वर्ल्ड २०२३ प्रदर्शन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** बाष्पके क्षेत्रामध्ये भारतातील बाष्पके ही आरबीआय कोडनुसार बनवली जातात. ही बनवताना अनेक अभियंते आणि कुशल कामगार आपले कौशल्य वापरतात. त्यामुळे केनियाने आयबीआर कोड स्वीकारल्यास भारत कमित कमी खर्चात बॉयलर पुरवू शकतो. तसेच केनियातील या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना भारताप्रमाणे पायाभूत प्रशिक्षण दिल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊन केनियाचा सर्वांगिण आर्थिक व औद्योगिक विकास साधता येईल, असे प्रतिपादन कामगारमंत्री डॉ.सुरेश(भाऊ) खाडे यांनी केनियातील नैरोबी येथे आयोजित बॉयलर वर्ल्ड २०२३ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.
ऑरेंज बिक टेक्नॉलॉजीच्या प्रयत्नातून बॉयलर वर्ल्ड २०२३ ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. यावेळी द रिपब्लिक ऑफ केनियाचे कामगार व सामाजिक संरक्षण कॅबिनेट सचिव फ्लोरेन्स बोर, राज्य उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.जुमा मखवाणा, केनियातील


**केनिया : येथील नैरोबी येथे आयोजित बॉयलर वर्ल्ड २०२३ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे**

भारताचे उच्चायुक्त (हाय कमिशन) नामग्या खांपा, ऑरेंज बिक टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लि.चे व्यवस्थापकीय संचालक भानू राजगोपालन, महाराष्ट्र बॉयलर्सचे संचालक धवल अंतापुरकर उपस्थित होते.
सुरक्षिततेचे महत्व लक्षात घेता बॉयलरचे सुरक्षित ऑपरेशन आणि योग्य देखभाल जीवन आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी आवश्यक आहे. उच्च सुरक्षा मानकांचे पालन करण्यात आणि बॉयलर फिल्डमध्ये सुरक्षिततेची संस्कृती वाढविण्यात आपण सर्वांनीच नेहमीच आघाडीवर असले पाहिजे असेही मंत्री डॉ. खाडे म्हणाले. संपूर्ण जगात भारताच्या कार्य कुशल मनुष्यबळाची मागणी आहे. मानवी भांडवलाचे तांत्रिक प्रशिक्षण आणि मुबलक उपलब्धता करण्यासाठी केनिया सरकारने एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे विनंती डॉ. खाडे यांनी केली.
जागतिक बँकेच्या 'इज ऑफ डूइंग बिझनेस' च्या ताज्या जागतिक क्रमवारीत भारताने जगात ६३ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. केनिया इन्व्हेस्टमेंट ऑथॉरिटी नुसार भारत हा केनियातील दुसरा सर्वात मोठा गुंतवणूकदार आहे. ६० पेक्षा अधिक मोठ्या भारतीय कंपन्यांनी उत्पादन, रियल इस्टेट (स्थावर मालमत्ता), औषधोत्पादन, दूरसंचार, आयटी, बँकिंग आणि कृषी आधारित उद्योगासह विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली आहे. भारतीय गुंतवणुकीमुळे केनियन नागरिकांना हजारो थेट नोकऱ्या निर्माण झाल्या असल्याचे मंत्री डॉ. खाडे यांनी याप्रसंगी सांगितले.

# इंजि. सुनील पोरे यांच्या पाठपुराव्याला यश

## दिवड हद्दीत अनेक वर्षे रखडलेले नॅशनल हायवे चे काम सुरू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** आमदार जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली इंजि. सुनील पोरे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून म्हसवड साखळी पुलाजवळ दिवड हद्दीत बरेच वर्षे रखडलेले नॅशनल हायवे चे काम अखेर आज पोलीस बंदोबस्तात सुरू करण्यात आले.
म्हसवड येथील नॅशनल हायवे चे काम बरेच वर्षे रखडले होते या रस्त्यारुन जाताना येताना गाड्यांचे व प्रवाशी यांचे अतोनात हाल होत होते. त्या रखडलेल्या कामाला गती देण्यासाठी इंजि. सुनील पोरे यांनी आमदार जयकुमार गोरे यांचे माध्यमातून वारंवार प्रयत्न केले. प्रसंगी दिल्लीत मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन अडचणी कानावर घातल्या. कॉन्ट्रॅक्टर कामाकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर २६ जानेवारी २०२३ रोजी सदरचे काम त्वरित सुरू करण्यासाठी उपोषण केले. त्या उपोषणास म्हसवडकरांनी पाठिंबा दिला होता.


**म्हसवड : येथील दिवड हद्दीतील साखळीपुल जवळ काम सुरु करण्यात आले असून यावेळी कामाची माहिती घेवून पाहणी करताना इंजि. सुनील पोरे**

यावेळी कॉन्ट्रॅक्टर व अधिकारी यांनी सर्व प्रलंबित व रखडलेले काम त्वरित पूर्ण करून देतो असे लिखित आश्वासन दिले होते व नॅशनल हायवे चे काम जलद गतीने सुरू देखील झाले. सर्व रस्त्याचे काम पूर्ण झाले असता म्हसवड दिवड हद्दीतील साखळीपुल जवळ काम पुन्हा कायदेशीर प्रक्रियेमुळे रखडले होते. त्या कामाचा देखील इंजि. सुनील पोरे यांनी वारंवार पाठपुरावा केला व सदरचे काम प्रत्यक्षात सुरू झाले आहे. यावेळी कामाची पाहणी व माहिती घेताना इंजि. सुनील पोरे, भाजपा म्हसवड शहराध्यक्ष बी.एम.अब्दागिरे, पोपटराव बनसोडे, शुभम पोरे, मेघा इंजीनियरिंग चे पीआरओ श्रीकांत घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते. हे काम सुरु झाल्यामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पोरे यांना धन्यवाद देत आहेत.







# इस्लामपुरात राष्ट्रवादीचा रास्ता रोको

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**इस्लामपूर :** येथील इस्लामपूर - कामेरी रस्त्याच्या रुंदीकरणाचे रखडलेलं काम तातडीने सुरु करावे, तसेच गॅस पाईपलाईनसाठी रस्ता खुदाई केल्याने दुरावस्था झालेल्या पेठ-सांगली रस्त्याची दुरुस्ती करावी. या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. येत्या आठ दिवसात रस्त्याचे काम सुरु करु असे आाश्वासन सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले.


**इस्लामपूर : येथील इस्लामपूर-कामेरी रस्ताच्या दुरावस्था प्रसंगी रास्ता रोको आंदोलन करताना राष्ट्रवादीचे पदाधिकारी**

राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, माजी नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, भगवान पाटील, माजी नगरसेव खंडेराव जाधव, माजी उपनगराध्यक्ष दादासो पाटील, संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. पेठ - सांगली रस्त्यावर ठिय्या मारुन रस्ता रोकण्यात आला. यावेळी प्रशासनाच्या कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.
यावेळी शहाजी पाटील म्हणाले, दिड वर्षापूर्वी माजी मंत्री आ.जयंत पाटील यांनी इस्लामपूर-कामेरी रस्त्याच्या रंदीकरणासाठी व काँक्रिटीकरणासाठी २५ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाचे भूमीपूजनही झाले होते. मात्र राज्यात सत्तांतर झाल्यापासून या कामाची अद्याप सुरुवात झालेली नाही. हे काम का रखडलेय, मंजूर निधीची कुठे विल्हेवाट लागली. याची माहिती जनतेला मिळायला हवी. गॅस पाईपलाईनसाठी खुदाई करण्यात आल्यामुळे पेठ-सांगली रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. त्यामुळे अपघात वाढले आहेत. या रस्त्यांमुळे अनेकांचे बळी गेले आहेत. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष आहे.
माजी नगराध्यक्ष सुभाष सुर्यवंशी, बाबुराव हुबाले, युवक राष्ट्रवादीचे सचीन कोळी, स्वरुप मोरे, सोन्या देसाई, रोझा किणीकर, प्रियांका साळुंखे, संगीता सपकाळ, पुष्पलता खरात, सुनीता कांबळे, भुषण शहा, सुहास हांडे आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.



# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत बनवडी ग्रामपंचायत प्रथम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** स्वच्छतेच्या सवयी अंगीकारुन ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्याच्या उद्देशाने राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन वर्षाचे विभागस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यातील बनवडी (ता.कराड) ग्रामपंचायतीला प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.




संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत विभागीय आयुक्त श्री. राव यांच्या अध्यक्षतेखालील विभागस्तरीय समितीने नुकतीच विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक मिळालेल्या ग्रामपंचायतींची तपासणी केली. या समितीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता श्री.राहणे, पुणे विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर, विकास शाखेच्या सहाय्यक आयुक्त सोनाली घुले आणि विकास शाखेचे उपायुक्त विजय मुळीक यांचा समावेश होता. समितीने केलेल्या पडताळणीनुसार विभागस्तरीय पारितोषिकासाठी पुढीलप्रमाणे ग्रामपंचायती पात्र ठरल्या आहेत.

सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यातील बनवडी ग्रामपंचायतीला विभागस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर झाला असून बक्षीसाची रक्कम रुपये दहा लाख आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आजरा तालुक्यातील वाटंगी आणि पुणे जिल्ह्यात जुन्नर तालुक्यातील काळेवाडी ग्रामपंचायतींना ८ लाख रुपयांच्या द्वितीय पुरस्कार विभागून जाहीर करण्यात आला असून सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील नांगोळे आणि खंबाळे ग्रामपंचायतींना तृतीय क्रमांकाचा ६ लाखांचा पुरस्कार विभागून जाहीर करण्यात आला आहे.

बनवडी ग्रामपंचायतीला स्व.वसंतराव नाईक पुरस्कार, वाटंगी ग्रामपंचायतीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार तसेच सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर तालुक्यातील भोसे ग्रामपंचायतीला स्व.आबासाहेब खेडेकर असे प्रत्येकी तीस हजार रुपये रक्कमेचे विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

स्वच्छतेशी आणि ग्रामविकासाशी निगडीत क्षेत्रामध्ये भरीव काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर पुरस्कार देण्यात येतात. या अभियानांतर्गत पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, घर, गाव व परिसर स्वच्छता, वैयक्तीक स्वच्छता व लोकसहभाग आणि वैयक्तीक व सामुहिक पुढाकारातून विकासासाठी राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम आदी बाबींची तपासणीच्या आधारे गुणांकन करण्यात येते.

विभागस्तरावरील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरतात.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन २१ ऑगस्टला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** तालुका, जिल्हा, विभागीय व मंत्रालयीन स्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन तर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. माहे ऑगस्ट या महिन्यातील जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवार, २१ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी दिली.

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. महिलांनी आपल्या तक्रारी, अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक कराव्यात. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, सेवा व आस्थापना विषयक बाबी, सामुहिक स्वरूपाचे तक्रार अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले आहे.




# अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यापासून मुख्यमंत्री अस्वस्थ : अनिल देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यापासून मुख्यमंत्री अस्वस्थ झाले आहेत. ते बोलून दाखवत नाहीत. मात्र, ते अस्वस्थ आहेत, असा दावा माजी मंत्री राष्ट्रवादी काँग्रेस नेते अनिल देशमुख यांनी केला.


अनिल देशमुख

सर्वोच्च न्यायालयाने नबाब मलिक यांना जामीन दिला. आम्हा सर्वांनाच याचा आनंद आहे. खोट्या प्रकरणात त्यांना अडकविण्यात आले होते. तसेच राजकारणाच्या माध्यमातून त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. विरोधकांवर राजकारणापोटी कारवाई करण्यात येत आहे, असा आरोपही देशमुख यांनी केला. राज्यात आणि दुसरीकडे सत्ता पक्षाच्या विरोधी सरकार आहे. त्यांना राजकीय विरोध करण्याचे काम सुरू आहे. राजकीय विरोधकांना त्रास देण्याचे काम सुरू आहे, असेही ते म्हणाले.




# महांकाली मंदिरातील दुकानगाळे पाडणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कवठेमहांकाळ :** येथील महांकाली मंदिर परिसरातील पहिल्या मजल्यावरील दुकानगाळे आठ दिवसांत पाडण्याचा निर्णय शुक्रवारी घेण्यात आला. महांकाली मंदिराचे बांधकाम कोल्हापूर आणि तुळजापूर येथील मंदिराच्या प्रमाणे व्हावे, यासाठी गेले काही महिने भाविकांचा लढा सुरु आहे. दुसऱ्यांदा शहर बंदची हाक भाविकांच्या वतीने देण्यात आली होती. बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी हा निर्णय घेण्यात आला.


**कवठेमहांकाळ : येथील महांकाली मंदिरातील दुकानगाळे पाडण्याबाबत बंद पुकारण्यात आला होता.**

शहरातील नागरिकांनी मल्लिकार्जुन मंदिरापासून ते महांकाली मंदिरापर्यंत मोर्चा काढला. पोलीस उपाधीक्षक सुनील साळुंखे परिविक्षाधिन पोलीस उपाधीक्षक संदेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीमध्ये नागरिक व विश्वस्त यांच्यामध्ये झालेल्या चर्चेमध्ये निर्णय घेण्यात आला. तसेच परिसरात असलेले पहिल्या मजल्यावरील गाळे येत्या आठ दिवसांत पाडण्याचा निर्णय घेण्यात आला. लेखी पत्र सर्वांच्या उपस्थितीत तयार करण्यात आले. दरम्यान, बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला होता मल्लिकार्जुन मंदिरापासून ते महांकाली मंदिरापर्यंत मोर्चा काढला. मोर्चा महांकाली मंदिराजवळ येताच पोलीस उप अधिक्षक संदेश नाईक यांनी हे आंदोलन स्थगित करावे, असे आवाहन केले. शहरातील नागरिकांना बैठकीत कोणता निर्णय झाला आहे याबाबतची माहिती नसल्यामुळे गैरसमज निर्माण झाला. यामुळे नागरिकांनी थोडा वेळ गोंधळ घातला, परंतू शहरातील नागरिक दिलीप पाटील, मिलींद कोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष टी. व्ही. पाटील, पांडुरंग पाटील, नगरसेवक विश्वनाथ पाटील यांनी बैठकीमध्ये झालेला निर्णय नागरिकांना वाचून दाखवला. यावेळी मिलिंद कोरे, विकास सोसायटी चेअरमन दिलीप झुरे, उदय शिंदे, अनिल लोंढे, विक्रांत पाटील, जगन्नाथ शिंदे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष वैभव बोगार, तुकाराम पाटील, पांडुरंग पाटील, शिवसेनेचे तालुका प्रमुख मारुती पवार, मंगेश मोकाशी, उदय भोसले, नगरसेवक अजित माने, संजय वाघमारे, रणजीत घाडगे, विश्वनाथ पाटील, माजी सरपंच सुनील माळी, चंद्रकांत पाटील, प्रताप पाटील, अय्याज मुल्ला, राजू घाडगे यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी आमदार मेधा कुलकर्णी नाराज

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे:** पुणे शहराचे पश्चिमद्वार म्हणून चांदणी चौकाची ओळख आहे.त्या चौकामध्ये प्रवाशांना अनेक वर्षांपासून वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत होते.त्या वाहतूक कोंडीमधून प्रवाशांची सुटका करण्यासाठी सुसज्ज असा रस्ता आणि पुलाचे लोकार्पण उद्या होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.तर या सोहोळ्यापूर्वी नव्या वादाला सुरुवात झाली असून भाजपच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट लिहित विद्यमान आमदार आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना यातून लक्ष्य केल्याचे दिसत आहे.


मेधा कुलकर्णी

२०१४ ते २०१९ च्या कालावधीमध्ये कोथरूड विधानसभा मतदार संघाच्या मेधा कुलकर्णी या आमदार होत्या. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मेधा कुलकर्णी यांना डावलून चंद्रकांत पाटील यांना पक्ष नेतृत्त्वाने संधी दिली होती. त्यावेळी मेधा कुलकर्णी यांनी पक्षातील नेत्यांबाबत उघडउघड भूमिका मांडत नाराजी व्यक्त केली होती.

मेधा कुलकर्णी यांना स्थानिक प्रकल्पांच्या उदघाटनपासून दूर ठेवल्याने त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून नाराजी व्यक्त केली आहे. आता यावर भाजप मधील नेते मेधा कुलकर्णी यांच्या बाबत काय निर्णय घेतात.हे पाहणे जरुरीचे ठरणार आहे.या सर्व घडामोडी बाबत मेधा कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला असता त्या म्हणाल्या की, या प्रकरणी आज भूमिका मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजपच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्ट नेमक काय लिहिले आहे.ते पाहूयात असे निष्ठावंतांचे डावललेले जिणे माझ्यावरील कुरघोडया, डावलणे याबद्दल मी कधी जाहीर वाच्यता केली नव्हती. विश्वासात न घेता अचानक निर्णय घेतले तेव्हाही.. पण आता दुःख मावत नाही मनात वाटले बोलावे तुमच्याशी. चांदणी चौक उद्घाटन कार्यक्रमाची कोथरूडमधील पत्रके पहिली आणि खूप वाईट वाटले.




# आप खासदार राघव चड्ढा राज्यसभेतून निलंबित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** बनावट सह्यांच्या प्रकरणात आम आदमी पार्टीचे खासदार राघव चड्ढा यांना राज्यसभेतून निलंबित करण्यात आलं आहे. खासदार राघव चड्ढा यांच्याविरोधात राज्यसभेत प्रस्ताव मांडला जात आहे. सभागृहात त्यांचं वर्तन अत्यंत निषेधार्ह असल्याचं भाजपा खासदारांचं म्हणणं होतं. त्यांच्यावर आता कारवाई करण्यात आली आहे. राज्यसभेचे खासदार पियुष गोयल राघव चड्ढांवरील कारवाईवर म्हणाले, हे खूप गंभीर प्रकरण आहे.

पाच खासदारांनी असा दावा केला आहे की त्यांच्या संमतीशिवाय दिल्ली सेवा विधेयक निवड समितीकडे पाठवण्याच्या प्रस्तावावर त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या नावांचा उल्लेख करण्यात आला होता. हा प्रस्ताव आपचे खासदार राघव चड्ढा यांनी मांडला. भारतीय जनता पार्टीचे तीन खासदार, बिजू जनता दल आणि एआयएडीएमकेच्या एका खासदाराचा यात समावेश आहे. या खासदारांनी या संपूर्ण प्रकरणाचा निषेध नोंदवला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली होती.



त्यानंतर चड्ढा यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बिजू जनता दलचे सस्मित पात्रा, भाजपाचे नरहरी आमीन, भाजपाचे सुधांशू त्रिवेदी, नागालँडचे खासदार फांगनोन कोन्याक (भाजपा) आणि लोकसभेचे माजी उपसभापती थंबीदुरई (अण्णाद्रमुक) यांची नावं चड्ढा यांच्या यादीत होती.

दरम्यान, राघव चड्ढा हे या कारवाईनंतर सदनाबाहेर आले आणि प्रसारमाध्यमांना म्हणाले, मी काहीच चुकीचं केलेलं नाही. तसेच त्यांनी याप्रकरणी ट्वीटही केलं आहे. विशेषाधिकार भंगाचा अहवाल येईपर्यंत राघव चड्ढा यांचं निलंबन कायम राहणार आहे. हे प्रकरण समोर येताच राज्यसभेच्या उपसभापतींनी आश्वासन दिलं आहे की, या संपर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल. याप्रकरणी तपास करून निर्णय घेतला जाईल.

